# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

वेळ : तीन तास | कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

### उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

### Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

*(a)* "भाषा एक संकेतप्रणाली आहे," सोदाहरण स्पष्ट करा.

*(b)* बोलींची विविधता सांगून डांगी बोलीची वैशिष्ट्ये लिहा.

*(c)* मराठीत किती विभक्ती मानाव्यात, ह्यासंबंधीच्या चर्चेचे साधार विवेचन करा.

*(d)* लोकगीतातील संस्कारगीतांचे स्वरूप स्पष्ट करा.

*(e)* भाषिक भांडार व लघुक्षेत्र ह्या संकल्पना स्पष्ट करा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* भाषा, समाज व संस्कृती ह्यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा. 20

*(b)* प्रयोग म्हणजे काय, ते सांगून कर्तरीप्रयोगाचे उपप्रकार सोदाहरण लिहा. 15

*(c)* मराठीतील दैवतकथांचे स्वरूप स्पष्ट करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* लोककथागीतांची विविधता सोदाहरण लिहा. 20

*(b)* भाषेची मूलभूत कार्ये स्पष्ट करा. 15

*(c)* क्रियापदाचे वाक्यातील महत्त्व अधोरेखित करून क्रियापदाचे विविध प्रकार सोदाहरण सांगा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* प्रमाणभाषेपेक्षा अहिराणी बोली कशी वेगळी ठरते, ते सोदाहरण लिहा. 20

*(b)* सर्वनामाचे प्रकार सांगून पुरुषवाचक सर्वनामाचे अर्थ व उपयोग स्पष्ट करा. 15

*(c)* साहित्याच्या भाषेचे वेगळेपण विशद करा. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) संत नामदेवांचा भावकवी म्हणून परिचय करून द्या.

(*b*) पंडितकवी म्हणून वामन पंडितांच्या काव्याची वैशिष्ट्ये लिहा.

(*c*) साहित्य आणि संस्कृती ह्यांचा अनुबंध स्पष्ट करा.

(*d*) स्वच्छंदतावादाची वैशिष्ट्ये लिहा.

(*e*) समाजशास्त्रीय समीक्षेची आवश्यकता स्पष्ट करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) 'लीळाचरित्रा'च्या निर्मितिप्रेरणा सांगून त्याचे वाङ्मयीन महत्त्व विशद करा. 20

(*b*) मर्ढेकरांच्या कवितेचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा. 15

(*c*) साहित्याचे मूल्यमापन करण्यात आस्वादक समीक्षा कितपत यशस्वी ठरते, ते साधार लिहा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) समीक्षा म्हणजे काय, ते सांगून साहित्याच्या आकलनात समीक्षेचे महत्त्व स्पष्ट करा. 20

(*b*) 'लावणी'च्या व्युत्पत्तीसंबंधी असलेल्या मतमतांतरांची चर्चा करा. 15

(*c*) मराठीतील नवकथेची वैशिष्ट्ये लिहा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) ''बखर म्हणजे इतिहास आणि वाङ्मय यांचे एकरूप होय'', ह्या विधानाची साधकबाधक चर्चा करा. 20

(*b*) दलित कवितेतून दलित चळवळीचे प्रतिबिंब कसे दिसून येते, ते साधार लिहा. 15

(*c*) साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे विशेष सांगा. 15

★ ★ ★